CNRNo.MHNB030020712022

संक्षिप्त फौ.खटला क्रं. ११९५/२०२२
सरकार वि. महेश रामा जाधव,
निशाणी क्रमांक १० च्या पुढे

## न्यायनिर्णय

## ( घोषित दिनांक ०३ मे, २०२५ )

दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. जे मुद्दे माझे विचाराधीन आहेत ते मुद्दे आणि त्यांची उत्तरे खालीलप्रमाणे –

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) दिनांक ०५/०९/२०२२ रोजी नंदुरबार शहरातील कंजरवाडा येथे एका पत्र्याच्या टपरी येथे आरोपी त्याच्या ताब्यात देशी दारु टँगो पंचच्या १८० मि.ली.च्या ५२ सिलबंद बाटल्या अवैद्यरित्या कब्जात बाळगुन तिची चोरटी विक्री करतांना आढळुन आला आणि त्याद्वारे कलम ६५{ई} महाराष्ट्र दारुबंदी कायदयान्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ....नकारार्थी. |
| २) आदेश काय. ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

२. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ पंच – संदिप जयंत वळवी व साक्षीदार क्र. २ (फिर्यादी) भुषण मार्तंड चौधरी यांची साक्ष नोंदविली. सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्रमांक १ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

### मुद्दा क्रमांक १ करीता–

३. (सा.क्र. २) फिर्यादी–जवान भुषण मार्तंड चौधरी यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक ०५/०९/२०२२ रोजी ते राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक नंदुरबार येथे कार्यरत असतांना सदर दिवशी दु. नि. एस. आर. नजन यांना गुप्त बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, नंदुरबार शहरातील कंजरवाडा परिसराम एक इसम देशी दारुची अवैधरित्या विक्री करत आहे. घटनास्थळी १२.१० वाजता छापा टाकला व आरोपीस जागीच पकडले. त्यावेळी आरोपीने त्याचे

नाव महेश रामा जाधव असे सांगितले. आरोपीच्या कब्जातुन दारु टँगो पंच १८० एम. एल. च्या ५२ बॉटल्स मिळून आल्या. दु.नि.एस. आर. नजन यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा निशाणी क्र. १४ तयार केला. त्यानंतर त्यांनी आरोपी विरुध्द फिर्याद निशाणी क्र.१५ दिली. गुन्हयातील जप्त मुद्देमालातील नमुना नाशिक यिेथील प्रयोगशाळेत दि. २०/०९/२०२२ च्या पत्रानुसार घेवुन गेलो होते. सदर पत्र नि. १६ येथे तयार केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

४. (सा.क्र.१) संदीप हा पंच साक्षीदार आहे. त्याने पंचनाम्यावरील त्याची सही मान्य करुन इतर मजकुर नाकारला आहे. त्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी त्याला सुचक प्रश्न विचारले. सुचक प्रश्नाच्या दरम्यान त्याने दिनांक ०५/०९/२०२२ रोजी पोलिसांनी त्याला पंचनाम्यासाठी बोलाविले होते आणि तेथे आरोपीच्या ताब्यातुन दारु जप्त केली ही बाब त्यांनी नाकारली आहे. त्यामुळे दारु जप्ती पंचनामा निर्विवादपणे सिध्द होवू शकलेला नाही.

५. प्रस्तुत प्रकरणाचा तसेच अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या साक्षी पुराव्यांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सदर प्रकरणामध्ये पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे सदर प्रकरणातील जप्ती पंचनामा हा निर्विवादपणे सिध्द होवु शकला नाही. त्यामुळे मुद्देमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त झाल्याचे सिध्द होत नाही. उर्वरित साक्षीदारांना वारंवार समन्स काढून सुध्दा ते साक्षीकरीता हजर झाले नाही. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ्थकरण अहवाल दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल गावठी हातभट्टी दारु होती ही बाब अभियोग पक्ष सिध्द करु शकला नाही. वरील सर्व कारणांमुळे अभियोग पक्ष आरोपीवर ठेवलेले आरोप विनाशंकेपलीकडे सिध्द करु शकला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता–</u>**

६. मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिल्यामुळे आरोपी ही निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेली देशी दारू ही जप्त असल्यास राज्य उत्पादन शुल्क, नंदुरबार यांच्याकडे योग्य त्या विल्हेवाटीसाठी पाठविणे योग्य होईल. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. आरोपी महेश रामा जाधव याची महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५–ई प्रमाणे शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रकीया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व हमीपत्र रद्द करण्यात येते.

०३. जप्त मुद्देमाल गावठी हातभट्टी दारु नाश केल्याने त्याबाबत आदेश नाही.

०४. आरोपीला आदेशित करण्यात येते की, त्याने रक्कम रुपये १५,०००/– वैयक्तिक बंधपत्र व जामिनदाराचे तेवढयाच किंमतीचे बंधपत्र दाखल करुन फौजदारी प्रकीया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ ची पुर्तता करावी. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

Digitally signed by ASMITA SHRIDHARRAO WANKHADE
Date: 2025.05.05 14:48:18 +0530

दिनांक – ०३ मे, २०२५

(श्रीमती. ए. एस. वानखडे)
अति मुख्य न्यायदंडाधिकारी,
नंदुरबार.

## <u>दाखला</u>

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – श्रीमती. प्रिया गोमटे, |
| न्यायालयाचे नाव | – सह दिवाणी न्यायालय व. स्तर, नंदुरबार |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | – ०३.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | – ०३.०५.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – ०५.०५.२०२५ |